## मुख्य वनसंरक्षक ठाणे(प्रा)

# माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे प्रदर्शित करावयाची माहिती

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये | ०३ |
| २ | अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्ये | १६ |
| ३ | निर्णय घेण्याची कार्यपध्दती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली | २० |
| ४ | कामाचे निकष | २१ |
| ५ | कार्ये पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदा | २४ |
| ६ | विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र | २५ |
| ७ | धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्य ज-नतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजाा | २६ |
| ८ | सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद याबाबतची माहिती | २७ |
| ९ | अधिकारी व कर्मचा-यांची निर्देशिका | २८ |
| १० | प्रत्येक कर्मचा-यांचे मासिक वेतन, नुकसान भरपाईची कार्यपध्दती | २९ |
| ११ | सर्व योजनांचा तपशिल प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प संवितरण रक्कम | ३० |
| १२ | सबसिडीचे कार्यक्रम पध्दत रकमा, लाभार्थीबाबतची माहिती | ४९ |
| १३ | ज्या व्यक्तींना सवलती, पध्दत रकमा, लाभार्थीबाबतची माहिती | ५० |
| १४ | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती | ५१ |
| १५ | लायब्ररीसह नागरिकांना माहिती मिळण्यासाठी दिलेल्या सुविधा | ५२ |
| १६ | माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे | ५३ |
| १७ | इतर माहिती | ५५ |

# १.कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये

ठाणेवनवृत्त कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालयातील रचना पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे.




A
मुख्य वनसंरक्षक (प्रा)
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
विभागीय वन अधिकारी (नियोजन)
विभागीय वन अधिकारी (दक्षता)
सहायक वन संरक्षक (जं का स)
कार्यालयीन अधिक्षक
मुख्य लेखापाल
कार्यालयीन कर्मचारी
तांत्रिक सहायक (वनपरिक्षेत्र अधिकारी)
लेखापाल
लिपीक
तैनाती वनरक्षक
शिपाई / रखवालदार


B
वनसंरक्षक, ठाणे
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार


C
उप वनसंरक्षक, डहाणु
क्षेत्रीय कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
कार्यालयीन कर्मचारी
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार


D
उप वनसंरक्षक, शहापुर
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार


E
उप वनसंरक्षक, जव्हार
क्षेत्रीय कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
कार्यालयीन कर्मचारी
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार


F
उप वनसंरक्षक, अलिबाग
क्षेत्रीय कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
कार्यालयीन कर्मचारी
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार


G
उप वनसंरक्षक, रोहा
क्षेत्रीय कर्मचारी
कार्यालयीन कर्मचारी
सहायक वन संरक्षक
वन परिक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार

# ठाणे वनवृत्त एकुण वनक्षेत्र

| अ.क्र. | वनविभाग | एकूण वनक्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १. | वनसंरक्षक,ठाणे | ९०९११.७७० |
| २. | उप वनसंरक्षक,डहाणू | ७८०१२.८३३ |
| ३. | उप वनसंरक्षक,जव्हार | ९०७८३.२२७ |
| ४. | उप वनसंरक्षक, शहापूर | ६६०९९.०१९ |
| ५. | उप वनसंरक्षक, अलिबाग | १०७४६२.३९१२ |
| ६. | उप वनसंरक्षक,रोहा | ५८६९९.९१८ |

# ठाणे वनवृत्त- पुनर्रचना

ठाणे वनवृत्तातील वनपरिक्षेत्र , परिमंडळ आणि नियतक्षेत्र यांचे पुनर्रचनेबाबत मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-७/आस्था-१/प्र.क्र.१३८/१३०/०७.०८ दिनांक ४/५/२००७ अन्वये मंजूरी मिळाली असून सदर पुनर्रचना दिनांक १/६/२००७ पासून कार्यान्वितम करण्याबाबत आदेश प्राप्त झाले आहेत व त्यानुसार उपवनसंरक्षक, सर्व यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-२/गुन्हे/पुनर्रचना /४१ दिनांक ९/४/२००७ अन्वये कळविण्यांत आलेले आहे.

उप वनसंरक्षक यांनी त्यांचे विभागातील वनक्षेत्राबाबत सादर केलेल अहवालावरुन तसेच माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे वनक्षेत्र मंजूर केलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**<u>१. ठाणे वनविभाग :-</u>**

उप वनसंरक्षक ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-२/गुन्हे/पुनर्रचना/४१ दिनांक ९/४/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र, परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे खालील वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ १७० /०७.०८ दिनांक १६/६/२००७अन्वये मंजूरी दिलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | गांव नमुना नं.१"अ" प्रमाणे हेक्टर | ८७०५३.५१६ हे. |
| २. | मुंबई व ठाणे ताब्यात घेतलेले कांदळवनाचे हेक्टर | १८०१.६९२ हे. |
| ३. | चौकशी होणेवर प्रलंबित ३५ सेक्शन क्षेत्र हे. | २०५६.५६१ हे. |

----------------------------------

एकूण वनक्षेत्र = ९०९११.७७० हे.

----------------------------------

**<u>२. डहाणू वनविभाग :-</u>**

उप वनसंरक्षक, डहाणू यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अ-११/वक्षेस/३००७/०६.०७ दिनांक २७/३/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र, परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे **<u>एकूण ७८०१२.८३३</u>** हेक्टर वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ १९७ /०७.०८ दिनांक २५/६/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

**<u>३. जव्हार वनविभाग :-</u>**

उप वनसंरक्षक, जव्हार यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अ/१२/आस्था/९३/०७.०८ दिनांक २२/४/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र ,परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे **<u>एकूण ९०७८३.२२७</u>**

हेक्टर वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ १७१ /०७.०८ दिनांक १६/६/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

जव्हार वनविभागाने त्यांचेकडील पत्र क्रमांक ब-१२/आस्था/२०६/२००७.०८ दिनांक १/६/२००७ अन्वये मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा.नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-७/आस्था-१/प्र.क्र.१३८/१३०/०७.०८ दिनांक ४/५/२००७ अन्वये मंजूर झालेल्या जव्हार वनविभागाचे पुनर्रचनेमध्ये खालीलप्रमाणे अशंत: बदल करणेचा असलेचे कळविल्यावरुन मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा.नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/१६१ /०७.०८ दिनांक ११/६/२००७ अन्वये खालीलप्रमाणे होणा-या बदलाबाबत कळविले आहे.

१. जव्हार वनविभागातील वनपरिक्षेत्र क्रमांक २३ उत्तर जव्हार मधील, अ.क्र. ११० वरील परिमंडळ " कौलाले " असे नमूद केले आहे. तरी परिमंडळ " कौलाले " ऐवजी **" आपटाळे" परिमंडळ व त्याचे मुख्यालय " आपटाळे " अशी दुरुस्ती होणेस विनंती आहे.**

२. जव्हार वनविभागातील वनपरिक्षेत्र क्रमांक २३ उत्तर जव्हार मधील, अ.क्र. ३३५ वरील नियतक्षेत्र " कौलाले " असे नमूद केले आहे. **तरी नियतक्षेत्र " कौलाले " ऐवजी नियतक्षेत्र " आपटाळे " अशी दुरुस्ती होणेस विनंती आहे.**

३. जव्हार वनविभागातील वनपरिक्षेत्र क्रमांक २३ उत्तर जव्हार मधील, अ.क्र. ३४० वरील नियतक्षेत्र " दसकोड " असे नमूद केले आहे. **तरी नियतक्षेत्र " दसकोड " ऐवजी नियतक्षेत्र " मोर्च्याचा पाडा " अशी दुरुस्ती होणेस विनंती आहे.**

तथापी अद्याप मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून त्याबाबत काही प्राप्त झालेले नाही.

तसेच उपवनसंरक्षक जव्हार यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ९३ दिनांक २२/४/२००७ अन्वये सादर केलेल्या माहितीमध्ये नविन निर्माण "**दक्षिण जव्हार**" **ऐवजी नवनिर्माण "उत्तर जव्हार**" असे दर्शविलेले आहे. तरी त्यांना मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा.नागपूर यांचेकउील पत्र क्रमांक १३० दिनांक४/५/२००७ अन्वयें नवनिर्मीत वनक्षेत्र दक्षिण जव्हार हयास मंजूरी मिळाली असल्याने उप वनसंरक्षक,जव्हार यांनी त्यांचे पत्रात त्याप्रमाणे दुरुस्ती करुन घ्यावी व यापुढे तसा पत्रव्यवहार करावा याबाबत उपवनसंरक्षक,जव्हार यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/२१३/०७.०८ दिनांक २८/६/२००७ अन्वये कळविण्यांत आलेले आहे.

## ४. शहापूर वनविभाग :-

उप वनसंरक्षक, शहापूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अ/१२/आस्था/१७/०७.०८ दिनांक ४/४/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र ,परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे **एकूण ६६०९९.०१९** हेक्टर वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ १७८ /०७.०८ दिनांक २०/६/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

## ५. अलिबाग वनविभाग :-

उप वनसंरक्षक, अलिबाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अ/१२/आस्था/२०४/०७.०८ दिनांक ९/५/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र ,परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे **एकूण १०७४६२.३९१२** हेक्टर वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ १८५ /०७.०८ दिनांक २२/६/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

## ६. रोहा वनविभाग :-

उप वनसंरक्षक, रोहा यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अ/१२/आस्था/३८/०७.०८ दिनांक ७/४/२००७ व पत्र क्रमांक ११/मोजणी/२०/०७.०८ दिनांक ५/५/२००७ अन्वये त्यांचे विभागातील वनक्षेत्र ,परिमंडळ व नियतक्षेत्र यामध्ये मोडणारे वनक्षेत्र इत्यादीबाबत दिलेल्या माहितीवरुन या कार्यालयाने त्यांचे विभागाचे **एकूण ५८६९९.९१८** हेक्टर वनक्षेत्रास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-८/दक्षता/ २१४ /०७.०८ दिनांक २८/६/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

## २. अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्ये

वन अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्राचे संरक्षण व विकासात्मक कामे करण्यांत येतात

### १. मुख्य वनसंरक्षक (प्रा)

१. मुख्य वनसंरक्षक यांचेकडे संपूर्ण वनवृत्ताचा प्रशासकीय कार्यभार असतो. तसेच त्याचेवर त्यांचे अधिपत्याखालील वनक्षेत्राची जबाबदारी असते

२. कार्यआयोजना तयार करणे, सर्व वनकामाचे नियंत्रण ठेवणे.

३. संपूर्ण वृत्ताचे अस्थापनेवर नियंत्रण ठेवणे.

४. त्यांचे वनवृत्तातील खर्च, अग्रिमे,सर्व कामे व त्यांचे करार,विक्री व पुरवठा आणि त्यांचे कार्यक्षेत्राचे सामान्य वनव्यवस्थापन करणे.

### २.वनसंरक्षक(प्रा)/उपवनसंरक्षक(प्रा)/विभागीय वन अधिकारी/ सहा. वनसंरक्षक

१. उपवनसंरक्षक यांचेकडे त्यांचे वन विभागाचा प्रशासकीय कार्यभार असतो. विभागीय कार्यालयाचे ते प्रभुख असतात.

२. त्यांचे विभागाकडील वन व्यवस्थापन, प्रशासन व अस्थापना नियंत्रण ठेवणे.

३. मंजूर आराखडानुसार वनांचे समुपयोजन, लागवड व संरक्षण आणि वनोपजांची विक्री नियोजन, विभागाला मालाचा पुरवठा करणे, महसूल जमा आणि खर्चावर नियंत्रण ठेवणे वनगुन्हांमध्ये मध्यस्थी करणे.

## ३. वनपरिक्षेत्र अधिकारी

१. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे संपूर्ण वनपरिक्षेत्राचा प्रशासकीय कार्यभार असतो.

२. त्यांचे परिक्षेत्रातील वनाचे संरक्षण व विकास यांची जबाबदारी असते.

३.उपवनसंरक्षक व सहा. वनसंरक्षक यांचे मार्गदशनाखाली मंजूर आराखडानुसार वनांचे समुपयोजन, लागवड व संरक्षण यांची अमंलबजावणी करणे

## ४. परिमंडळ अधिकारी (वनपाल)

१. वनपाल यांचेकडे त्यांचे संपूर्ण परिमंडळाचा प्रशासकीय कार्यभार असतो. वनसंरक्षण, वनगुन्हा अन्वेषण, वनोपज वाहतूक परवाना वितरण, चराई फी, वनगुन्हयांची भरपाई, कुपातील वृक्षांची चिन्हांकित करणे,

२. त्यांचे परिमंडळातील सर्व कामांना ते जबाबदार असतात. त्यांचे अधिपत्याखालील वनरक्षकांना त्यांची कर्तव्ये, दैनंदिनी व वनहद्दीबाबत माहिती पुरवणे. नियम व अधिनियम व कर्तव्य याबाबत स्पष्टीकरण करणे.

## ५. नियतक्षेत्र अधिकारी (वनरक्षक) -

१._वनरक्षक यांचेकडे त्यांचे नियतक्षेत्राचे संरक्षण व गस्त घालणे.

२. वनहद्दीचे दुरूस्ती व परिरक्षण करणे

३. ग्रामस्थांकडून होणा-या वनातील अतिक्रमणाबाबत दक्षता बाळगणे

४. त्यांचे अधिपत्याखालील नियतक्षेत्रात गुरांना चराई करून न देणे

५. अवैध वृक्षतोड टाळण्यासाठी अधिपत्याखालील नियतक्षेत्रात वारंवार गस्ती घालणे

६. विहित कालावधीत जाळ रेषा घेणे, उंचावरून जाळ ठिकाणाची पहाणी करणे व प्रकरणी कार्यवाही करणे

७. राखीव वनक्षेत्रात अवैध शिकार व वनतळयातील मासेमारी याबाबतचा अहवाल वरिष्ठांस सादर करणे
९. बुडावर शिक्का मारणे
१०.बी पेरण, रोपवाटिका तयार करणे, बी गोळा करणे, लागवड व वरिष्ठांचे आदेशानुसार इतर कामे करणे.
११. त्यांचे ताब्यातील वन विश्रामगृह व त्यासभोवतीचा परिसर नीट व स्वच्छ ठेवणे,
१२. वनगुन्हांचे शोध धेवून प्रथम रिपोर्ट सादर करणे, गुन्हेगाराचा शोध घेणे व गुन्हेगारांला शोधून परिमंडळ अधिकाराकडे स्वाधीन करणे.

६. **वनक्षेत्र सर्व्हेक्षक** - १. वनक्षेत्र सर्व्हेक्षकांचे वनक्षेत्राचे सर्वेक्षण नोंदी यांची देखभाल करणेची जबाबदारी महसूल जिल्हा निरिक्षकाप्रमाणे असते.
२. नकाशाची नोंदवही अद्यावत ठेवणे
३. वनविभागाकडील नकाशा नोंदवही, महसूल विभागाकडील नकाशा संच, नमुना १ मधील वनविभागाचे राखीव व खाजगी वनांचे नोंदी महसूल विभागाकडील दप्तरातील नोंदीशी प्रमाणित करणे.
४. प्रादेशिक विभागाकडील ज्यावेळी सिमा व सिमांकन कामाचा कार्यभार घेतला जातो त्यावेळी लागवड क्षेत्र व कुप यांचे नकाशे तयार करून पडताळणी करणे.

७. **वनसर्व्हेक्षक** -१. कार्यआयोजनेचे आराखडयानुसार सिमांकन करणे
२. उपवनसंरक्षक यांचे निर्देशानुसार इतर सर्वेक्षण व सिमांकन करणे.
३. कंपाटमेंट व कुपांचे आरेखन करणे
४. वनक्षेत्राचे गणन व मोजमाप करणे

५. शासन अधिसूचनेनुसार वनीकरणक्षेत्र व निकृष्ठ वनक्षेत्राचे नकाशांची दुरूस्ती व नोंदी करणे

६. प्रभावित वनक्षेत्रा संदर्भातील सर्वेक्षण व सिमांकन करणे व त्या संदर्भातील पत्रव्यवहाराची इतिहास पुस्तीका अद्यावत ठेवणे.

८. **वनअभियंता/उपवनअभियंता** - १. इमारती , रस्ते, इतर अभियांत्रिकी कामे यांची संरचना व दरूस्ती कामी अंदाजपत्रके तयार करणे

२. तांत्रिक वाहतुक व पुरवठा या संदर्भात मार्गदर्शन करणे

३. आरागिरणीच्या कामकाजाची तांत्रिक पहाणी करणे

९. **सांख्यिकी सहा. वरिष्ठ/कनिष्ठ** -१. वनसांख्यिकीच्या स्वरूपातील उपलब्ध असलेली सर्व माहिती अद्यावत ठेवणे.

२. वनवृत्ताचा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करणे

## ३. निर्णय घेण्याची कार्यपध्रदती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली

वनांचे संरक्षण व विकासात्मक कामासाठी वृत्तस्तरावर मुख्य वनसंरक्षक, विभागीय स्तरावर उपवनसंरक्षक व क्षेत्रिय स्तरावर वनक्षेत्रपाल यांचे अधिपत्याखाली नियमांचे अनुषंगाने निर्णय घेतले जातात. ज्या वनक्षेत्राचे कार्यआयोजन मंजुर आहे त्या वनक्षेत्रात मंजुर कार्यआयोजने प्रमाणे कार्यवाही केली जाते.

## ४. कामाचे निकष

वनविभागाचे मुख्य काम वन संरक्षण हे आहे. त्यानुसार वनविभागांची रचना असुन त्यानुसार नियतक्षेत्रावरती वनरक्षकांची नेमणुक केलेली असते, व जंगल संरक्षणाकरीता वनरक्षकांची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. सदर नियतक्षेत्राच्या वनरक्षकांवरती नियंत्रण ठेवणे व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणेकरीता काही नियतक्षेत्रांचा मिळुन परिमंडळ बनविले जाते व ठराविक परिमंडळाचे एक वनपरिक्षेत्र असते हया वनपरिक्षेत्रावर वर्ग २ दर्जाचा वनपरिक्षेत्र अधिकारी असतो तो संपुर्ण परिक्षेत्रावरती वनसंरक्षणाचे नियंत्रण करतो.

वन संरक्षणाशिवाय वनामध्ये विकासाची कामे घेतली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने जंगलाची वाढ करणेकरिता रोपवन करणे, चर खोदणे, वनतळी बांधणे इत्यादी कामांचा समावेश होतो. त्या कामावरतीही वनरक्षक, वनपाल व वनक्षेत्रपाल यांचेमार्फत नियंत्रण ठेवले जाते.

वन संरक्षण करताना किती गुन्हे पकडले, त्यामध्ये किती प्रकरणे निकाली काढली त्याबाबतची अवैध वृक्षतोड, अतिक्रमण, अवैध वाहतुक, वन्यजीव, वनवणवा व इतर गुन्हेकामांची माहिती दर्शविणारा सन २००७-०८ करिताचा अहवाल समवेत समाविष्ठ केलेला आहे.

## Abstract of Range

| Sr. No. | Circle | Divn. | Range | Range: Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Thane | Thane | 11 | 7 | 4 | 0 | 11 |
| 2 | | Dahanu | 10 | 4 | 5 | 1 | 10 |
| 3 | | Jawhar | 10 | 5 | 4 | 1 | 10 |
| 4 | | Shahapur | 6 | 2 | 3 | 1 | 6 |
| 5 | | Alibag | 11 | 6 | 3 | 2 | 11 |
| 6 | | Roha | 6 | 5 | 1 | 0 | 6 |
| | Total - | | 54 | 29 | 20 | 5 | 54 |

## Abstract of Round

| Sr. No. | Circle | Divn. | Round | Round: Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Thane | Thane | 51 | 35 | 12 | 4 | 51 |
| 2 | | Dahanu | 51 | 24 | 20 | 7 | 51 |
| 3 | | Jawhar | 45 | 32 | 11 | 2 | 45 |
| 4 | | Shahapur | 32 | 17 | 13 | 2 | 32 |
| 5 | | Alibag | 62 | 48 | 8 | 6 | 62 |
| 6 | | Roha | 34 | 29 | 4 | 1 | 34 |
| | Total - | | 275 | 185 | 68 | 22 | 275 |

## Abstract of Beats

| Sr. No. | Circle | Divn. | Beats | Beats: Normal | Sensitive | Hyper Sensitive | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Thane | Thane | 170 | 126 | 28 | 16 | 170 |
| 2 | | Dahanu | 144 | 82 | 46 | 16 | 144 |
| 3 | | Jawhar | 130 | 95 | 28 | 7 | 130 |
| 4 | | Shahapur | 107 | 81 | 23 | 3 | 107 |
| 5 | | Alibag | 227 | 171 | 38 | 18 | 227 |
| 6 | | Roha | 112 | 94 | 15 | 3 | 112 |
| | Total - | | 890 | 649 | 178 | 63 | 890 |

गोषवारा

प्रलंबित वनगुन्हयांची स्थिती दर्शविणारे प्रपत्र

तिमाही कालावधी दिनांक १/१/२००८ ते ३१/३/२००८

| वनगुन्हयाचा प्रकार | तिमाही सुरवाती पर्यंत वनगुन्हे संख्या | चालू तिमाही मध्ये - नोंदविलेल या वनगुन्हयांची संख्या | एकुण वनगुहे संख्या | चालू तिमाही मध्ये - न्यायालयात दाखल केलेल्या गुन्हयां ची संख्या | चालू तिमाहीमध्ये निकाली काढण्यांत आलेल्या वागुहयांची संख्या | | | तिमाही अखेर प्रलंबित वागुहे संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विभागातो निकाली कढले ल्या वन गुन्हयांची संख्या | यायालयातो निकाली काढले ल्या वन गुन्हयांची संख्या | एकुण निकाली काढलेल्या वनगुन्हयांची संख्या | चौकशी वर | सक्षम अधिका-यांच्या आदेशा करीता प्रलंबित | वसुली वर | न्याया लयात | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| अवैध वृक्षतोड | 13042 | 1110 | 14152 | 0 | 3136 | 0 | 3136 | 5525 | 1311 | 4021 | 159 | 11016 |
| अतिक्रमण | 7318 | 58 | 7376 | 0 | 335 | 5 | 340 | 3759 | 2449 | 124 | 704 | 7036 |
| अवैध वाहतुक | 223 | 21 | 244 | 1 | 17 | 0 | 17 | 172 | 17 | 11 | 27 | 227 |
| वयजीव | 70 | 2 | 72 | 1 | 1 | 0 | 1 | 45 | 2 | 0 | 24 | 71 |
| वावणवा | 551 | 199 | 750 | 0 | 176 | 0 | 176 | 525 | 49 | 0 | 0 | 574 |
| इतर | 1234 | 212 | 1446 | 0 | 291 | 0 | 291 | 1008 | 65 | 52 | 30 | 1155 |
| **एकुण** | 22438 | 1602 | 24040 | 2 | 3956 | 5 | 3961 | 11034 | 3893 | 4208 | 944 | 20079 |

## ५.कार्ये पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदा

वनक्षेत्राचे संरक्षण प्रभावीपणे करणे याकरिता वनकर्मचा-यांना शासनाने अधिकार प्रदान केलेले आहेत. कर्तव्ये पार पाडताना वनकर्मचारी शासनाने वनविभागाकरीता निश्चित केलेल्या खालील नियमांचा वापर करतात.

१) भारतीय वन अधिनियम १९२७

२) मुबंई वन संहिता १९४२

३) महाराष्ट्र वृक्षतोड कायदा १९६४ व त्यावरील अनुषंगिक नियम

४) महाराष्ट्र वृक्षतोड कायदा १९६७

५) अनुसुचित जमाती मालकीच्या वृक्षतोडीबाबतचा सन १९६९ चा कायदा

६) महाराष्ट्र वनोत्पादन (नियम) कायदा १९६९ आणि त्यावरील अनुषंगिक नियम

७) वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ आणि त्याचेवरील त्यावरील अनुषंगिक नियम

८) महाराष्ट्र खाजगी वन संपादन कायदा १९७५

९) साईटीस १९७५

१०) वित्तीय अधिकार खंड १९७८

११) वन (संरक्षण) कायदा १९८०

१२) महाराष्ट्र नागरी सेवा

## ६. विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र

विभागातील कागदपत्रांची वर्गवारी कक्षवार करण्यांत येवून प्रत्येक कक्षातील कागदपत्र वाटप केल्यानंतर त्या त्या कक्षाकडे ठेवण्यांत येणा-या कार्यविवरणात त्याची नोंद घेण्यांत येते. मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचे कार्यालयात १ ते ११ कक्ष आहेत व त्यानुसार कागदपत्राचे वाटप करून प्रत्येक कागदाचे अनुषंगिक संबंधित कक्षाकडून कार्यवाही करण्यांत येते.

वरील प्रमाणे ठाणे वनवृत्तांतर्गत इतर ६ वनविभागामध्ये कक्ष पध्दती अवलंबिविली जाते, कक्षवार कार्यविवरण ठेवून कागदपत्रांची वर्गवारी केली जाते.

## ७. धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना

वनाचे संरक्षण करणे हे वनविभागाचे आद्य कर्तव्ये आहे, त्याकरिता शासनाने नियम तयार केलेले आहेत व त्याची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक तितके अधिकार संबंधित कर्मचा-यांना दिलेले आहेत. तथापि शासनाच्या सुधारित धोरणानुसार ग्रामस्थाना वनव्यवस्थेपनेमध्ये समाविष्ठ केले जाते. त्याकरिता शासनाने शासन निर्णय दिनांक १६/३/१९९२ व २५/४/२००३ नुसार संयुक्त वनव्यवस्थापन ही संकल्पना अंमलात आणली आहे. संयुक्त वनव्यवस्थापन योजनेनुसार ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्या मदतीने व सहकार्यातुन वनसंरक्षणाच्या व विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

## ८. सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद याबाबतची माहिती

वनविभागाचे वन संरक्षण हे मुख्य काम असल्याने जनतेचा सहभाग त्यामध्ये नाही. तथापि जनसामान्यामध्ये वनविभागाविषयी विश्वासार्हता निर्माण करावी व वनाविषयी आपुलकी वाटावी या उद्देशाने संयुक्त वन व्यवस्थापन, तेंदू पाने विक्री सल्लागार समिती इत्यादी स्थापना करण्यांत आली आहेत.

# ९. अधिकारी व कर्मचा-यांची निर्देशिका

या वृत्तातील सर्व वन कर्मचा-यांची संवर्गवार वार्षिक ज्येष्ठतायादी प्रकाशित करण्यांत येते. सद्यस्थितीत प्रकाशित करण्यांत आलेल्या ज्येष्ठता यादींचा तपशिल खालील प्रमाणे आहे

१) मुख्यलेखापाल - ०१/०१/२००८

२) लेखापाल - ०१/०१/२००७

३) सर्वेअर - ०१/०१/२००७

४) वनक्षेत्र सर्व्हेक्षक - ०१/०१/२००७

५) लिपिक - ०१/०१/२००७

६) वनपाल - ०१/०१/२००७

७) वनरक्षक - ०१/०१/२००७

८) शिपाई - ०१/०१/२००६

वरीलपैकी मुख्यलेखापाल,वनपाल, वनक्षेत्रसर्व्हेक्षक, वनसर्व्हेक्षक, वनपाल या संवर्गाच्या जेष्ठता यादया राज्यस्तरावर व उर्वरित लेखापाल, लिपीक, वनरक्षक, शिपाई इ. संवर्गाच्या जेष्ठता यादया वृत्तस्तरावर ठेवल्या जातात.

## १०. प्रत्येक कर्मचा-यांचे मासिक वेतन, नुकसान भरपाईची कार्यपध्दती

कर्मचा-यांची मासिक वेतन देयके तयार करण्यांत येवून कोषागार अधिकारी, ठाणे यांचेकडून प्रमाणित करण्यांत आल्यानंतर सदर रक्कम धनादेशाव्दारे बॅकेत जमा करण्यांत येते व बॅकेकडून प्रत्येक कर्मचा-यांचे वेतनाची रक्कम संबंधिताचे खात्यात जमा केली जाते.

नुकसान भरपाई प्रकरणी कर्मचा-यांकडून प्राप्त होणारी वैद्यकीय देयके संबंधितांना उपरोक्त कार्यपध्दतीनुसार आदा केली जातात. उपरोक्त पध्दत हया वृत्ताअंतर्गत असणा-या सर्व विभागीय कार्यालयामध्ये अवलंबिली जाते.

# ११. सर्वे योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प, संवितरीत रक्कम

ठाणे वनवृत्तामध्ये सन २००८-०९ मध्ये कार्यरत असलेल्या योजना / अर्थसंकल्पीय तरतुद व त्या योजनांवर जुन २००८ अखेर झालेला खर्च दर्शविणारे विवरणपत्र समवेत समाविष्ट केलेले आहे.

<table>
<tr><th colspan="11">सन 2008-09 करिता योजनातंर्गत योजना</th></tr>
<tr><th rowspan="2">अ. क्रं.</th><th rowspan="2">योजनेचे नाव</th><th rowspan="2">वनविभाग</th><th rowspan="2" colspan="3">योजनेचा तपशिल</th><th colspan="3">सन 2008-09 ची तरतूद रू. लाखात</th><th rowspan="2">माहे जून 08 अखेर</th><th rowspan="2">शेरा</th></tr>
<tr><th>मंजूर नियतव्यय</th><th>आवश्यक अनुदान</th><th>प्राप्त अनुदान</th></tr>
<tr><td colspan="11">आदिवासी उपयोजना - चालू बाब प्रस्ताव</td></tr>
<tr><td rowspan="6">1</td><td rowspan="6">निकृष्ठ वनांचे पुर्नवनिकरण (2406 0864)</td><td rowspan="6">ठाणे व रायगड</td><td rowspan="6">पूर्वी स्थानिक लोकांच्या गरजा जवळपासच्या जंगलातील उत्पान्नातून भागत होत्या.</td><td>पं.व.</td><td>12</td><td rowspan="6">43.57</td><td rowspan="6">43.59</td><td rowspan="6">43.57</td><td rowspan="6">-</td><td rowspan="6">अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त झाले आहे.</td></tr>
<tr><td>च.व.</td><td>-</td></tr>
<tr><td>तृ.व.</td><td>5</td></tr>
<tr><td>व्दि.व.</td><td>21</td></tr>
<tr><td>प्र.व.</td><td>-</td></tr>
<tr><td>पू.पा.</td><td>48</td></tr>
</table>

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | परंतू वाढत्या लोकसंख्येच्या व जनावरांच्यामुळे सदरच्या वनांवर ताण पडला व परिणामी त्याचा - ह्रास झाल्याने निकृष्ट वनांची निर्मिती झाली. तसेच या वनक्षेत्राच्या जमिनीचा कस टिकवून धरण्यासाठी तोंड झालेल्या जंगल भगाच्या झाडाझुडुपांचे आच्छादन नष्ट होवून हा भाग वृक्षविरहीत झाला. या योजनेखाली मृदसंधारणाची बांधबंदिस्ती, समपातळीवर चर खोदणे, गली प्लगींग, करंज इ. कामे तसेच सदर भागांच्या सभोवताली गुरे प्रतिबंधक चर खोदणे व योग्य वृक्ष जातीचा वापर करून वनिकरण करणे इ. कामे केली जातात. | **एकूण** | **74** | | | | | |
| 2 | औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी | ठाणे | वाढती लोकसंख्या व वाढत्या औद्योगिकरणासाठी | पं.व.<br>व्दि.व.<br>प्र.व. | 318<br>107<br>115 | 17.35 | 26.79 | 17.35 | - | अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागणा-या वृक्ष जातीच्या झाडांची लागवड (4406 0287) | | इमारती सागवान, जळावू लागवड/ किटा इ. प्रकारच्या लाकडांची मागणी वाढली आहे. तसेच दरवर्षी साग, बांबू, सावर इ. झाडांची लागवड केली जाते. परंतू लोकांची इमारती झाडांची वाढती गरज भागविण्यासाठी सदरची योजना चालू ठेवणे अंत्यत निकडीचे आहे. | **एकूण** | **540** | | | | | झाले आहे. |
| 3 | मृदसंधारणार्थ विशिष्ठ जागेवर वनिकरण करणे (4406 0251) | ठाणे | जमिनीचा अयोग्य वापर वनांचे मोठया प्रमाणात नुकसान व यापुर्वी झालल्या अनियंत्रित वृक्ष तोडीमुळे वनांच्या संपत्तीत घट झाली व वारंवार उदभवणा-या महापुरामुळे कृषि उत्पादनावर त्याचा परिणाम झाला. पाण्याची पातळीसुध्दा ब-याचशा प्रमाणांत खाली गेली. येवू घातलेले संकट थांबविण्यासाठी मृदसंधारणार्थ वनिकरण ही योजना आखण्यांत | पू.पा.<br>**एकूण** | 55<br>**55** | 9.64 | 9.60 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आली व ती राबविण्यांत येते. | | | | | | | |
| 4 | गौण वनोत्पादन विकास (किरकोळ जंगल उत्पन्न) (4406 0358) | ठाणे | किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास करण्यासाठी या योजनातंर्गत रोशा गवत, घायपात, तेंदू, हिरडा, कोकम, रबर, काजू, चंदन, खैर, मोह इ. वनस्पतींची लागवड केली जाते या लागवडीवर स्थानिक लोकांची उपजिविका अवलंबून असते. दरवर्षी नियतव्ययाच्या उपलब्ध्तेच्या नविन क्षेत्रात लागवडीची कामे घेतली जातात. व आधीच्या लागवडीची देखभाल घेतली जाते. | प्र.व.<br>**एकूण** | 78<br>**78** | 11.17 | 12.90 | 11.17 | - | अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त झाले आहे. |
| **आदिवासी उपयोजना - नविन बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | कर्मचारी मजूरांकरिता सुखसोई (पिण्याचे पाणी) | ठाणे | वनक्षेत्रात काम करणा-या मजूराकरिता सुख्सोई उपलब्ध करुन देणे- यामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी , कूपनलिका बांधणे | पूरक कामे | 1.00 | 1.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 6 | वनपर्यटन स्थळाचा विकास (2406 1996) | ठाणे | ठाणे वनविभागात पर्यटन स्थ्ज्ञळांचा विकास करणे आवश्यक आहे. या ठिकाणी ठाणे जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात पर्यटक येत असतात. मात्र त्यांच्यासाठी त्या ठिकाणी योग्य त्या सोई सवलती उपलब्ध नसल्यांन त्याचीं गैरसोय होते. ती दूर करण्यासाठी त्या ठिकाणी विकास कामे करून सोई सवलती उपलब्ध करून दिल्यास वनसंरक्षण व वनविकास तसेच जनतंचे सहकार्यातून वनांचे संवर्धनाबाबत वनविभागास अशा पर्यटकांनाआवाहन करता येईल व | पूरक कामे | 75.00 | 75.20 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | त्याचा निश्चितच परिणाम पर्यटनाचे आनंदासह होतील अशी अपेक्षा आहे | | | | | | |
| 7 | संयुक्त वनव्यवस्थापन (2406 2081) | ठाणे | वनांचे संरक्षणाकरिता व संवर्धनाकरिता पहिला कायदा 1865 साली अमंलात आला. तदनंतर त्या कायद्यात सुधारणा करून 1878 चा व नंतर 1927 चा कायदा अस्तित्वात आला. तरीही वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड निरनिराळया कारणास्तव वाढतच चालली. यास्तव केवळ शासकीय यंत्रणा वा कायदा | पूरक कामे | 9.64 | 9.64 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उपयुक्त ठरणार नाही तर वनसंपत्तीचा संरक्षणात जनतेच्या सहकार्याची नितांत गरज आहे. त्यामुळे समाजास बरोबर घेवून जंगल संरक्षण करण्याचे दृष्टीने ग्रामीणांच्या सहभागातून संयुक्त वनव्यवस्थापन ही संकल्पना उदयास आली. राष्ट्रीय वननिती 1988 अन्वये वनक्षेत्राचा विकास करणेसाठी वनसंरक्षणामध्ये लोकांचा सहभाग घेवून त्यांच्या सहभागातून वनाचे व्यवस्थ्ज्ञापन सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तसेच स्थानिक जनता व शासन यात हया वनसंरक्षणामुळे व रोपवनामुळे मिळणा-या उत्पन्नाचे फायदे विभागण्यात येणार असल्यामुळे वनसंवर्धन कामास | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उत्तेजन मिळून वनांच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासात भर पडण्यास मदत होत आहे. | | | | | | | |
| **आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनाना - चालू बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |
| 1 | निकृष्ट वनांचे पुर्नवनिकरण (2406 1261) | रायगड | पूर्वी स्थानिक लोकांच्या गरजा जवळपासच्या जंगलातील उत्पान्नातून भागत होत्या. परंतू वाढत्या लोकसंख्येच्या व जनावरांच्यामुळे सदरच्या वनांवर ताण पडला व परिणामी त्याचा - ऱ्हास झाल्याने निकृष्ट वनांची निर्मिती झाली. तसेच या वनक्षेत्राच्या जमिनीचा कस टिकवून धरण्यासाठी तोंड झालेल्या जंगल भगाच्या झाडाझुडुपांचे | पं.व. | 38 | 5.22 | 15.69 | 5.22 | - | अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त झाले आहे. |
| | | | | व्दि.व. | 6 | | | | | |
| | | | | प्र.व. | 84 | | | | | |
| | | | | **एकूण** | **128** | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आच्छादन नष्ट होवून हा भाग वृक्षविरहीत झाला. या योजनेखाली मृदसंधारणाची बांधबंदिस्ती, समपातळीवर चर खोदणे, गली प्लगींग, करंज इ. कामे तसेच सदर भागांच्या सभोवताली गुरे प्रतिबंधक चर खोदणे व योग्य वृक्ष जातीचा वापर करून वनिकरण करणे इ. कामे केली जातात. | | | | | | | |
| 2 | औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागणा-या वृक्ष जातीच्या झाडांची लागवड (4406 0545) **जिल्हास्तरीय** | रायगड | वाढती लोकसंख्या व वाढत्या औद्योगिकरणासाठी इमारती सागवान, जळावू लागवड/ किटा इ. प्रकारच्या लाकडांची मागणी वाढली आहे. तसेच दरवर्षी साग, बांबू, सावर इ. झााडांची लागवड केली जाते. परंतू लोकांची इमारती झाडांची वाढती गरज भागविण्यासाठी सदरची योजना चालू ठेवणे अंत्यत निकडीचे आहे. | पं.व.<br>प्र.व.<br>पू.पा.<br>**एकूण** | 88<br>71<br>37<br>**196** | 5 .78 | 5.76 | 5.78 | - | अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त झाले आहे. |
| **बिगर आदिवासी उपयोजना - चालू बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |

<table>
<tr><td rowspan="6">1</td><td rowspan="6">निकृष्ट वनांचे पुर्नवनिकरण (2406 0202)</td><td rowspan="6">ठाणे व रायगड</td><td rowspan="6">पूर्वी स्थानिक लोकांच् या गरजा जवळपासच्या जंगलातील उत्पान्नातून भागत होत्या. परंतू वाढत्या लोकसंख्येच्या व जनावरांच्यामुळे सदरच्या वनांवर ताण पडला व परिणामी त्याचा - ह्रास झाल्याने निकृष्ट वनांची निर्मिती झाली. तसेच या वनक्षेत्राच्या जमिनीचा कस टिकवून धरण् ण्यासाठी तोंड झालेल्या जंगल भताच्या झाडाझुडुपांचे टाच्छादन नष्ट होवून हा भाग वृक्षविरहीत झाला. या योजनेखाली म,दसंधारणाची बांधबंदिस्ती, समपातळीवर चर खोदणे गली प्लगींग, करंज इ. कामे तसेच सदर भागांच्या सभोवताली गुरे प्रतबंधक चर खोदणे व योग्य वृक्ष जातीचा वापर</td><td>पं.व.</td><td>53</td><td rowspan="6">29.00</td><td rowspan="6">29.03</td><td rowspan="6">-</td><td rowspan="6">-</td><td rowspan="6">अनुदान अद्यापि अप्राप्त</td></tr>
<tr><td>च.व.</td><td>12</td></tr>
<tr><td>तृ.व.</td><td>144</td></tr>
<tr><td>प्र.व.</td><td>110</td></tr>
<tr><td>पू.पा.</td><td>43</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>362</td></tr>
</table>

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | करून वनिकरण करणे इ. कामे केली जातात. | | | | | | | |
| 2 | मृदसंधारणार्थ विशिष्ठ जागेवर वनिकरण करणे (4406 0044) **जिल्हास्तरीय** | ठाणे व रायगड | जमिनीचा अयोग्य वापर वनांचे मोठया प्रमाणात नुकसान व यापुर्वी झालल्या अनियंत्रित वृक्ष तोडीमुळे वनांच्या संपत्तीत घट झाली व वारंवार उदभवणा-या महापुरामुळे कृषि उत्पादनावर त्याचा परिणाम झाला. पाण्याची पातळीसुध्दा ब-याचशा प्रमाणांत खाली गेली. येवू घातलेले संकट थांबविण्यासाठी मृदसंधारणार्थ वनिकरण ही योजना आखण्यांत आली व ती राबविण्यांत येते. | पं.व.<br>तृ.व.<br>व्दि.व.<br>प्र.व.<br>पू.पा.<br>**एकूण** | 42<br>93<br>21<br>157<br>30<br>**343** | 37.00 | 37.17 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 3 | औद्योगिक व | ठाणे व | वाढती लोकसंख्या | पं.व. | 169 | 28.00 | 32.15 | - | - | अनुदान |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यापारी उपयोगासाठी लागणा-या वृक्ष जातीच्या झाडांची लागवड (4406 0091) | रायगड | व वाढत्या औद्योगिकरणासाठी इमारती सागवान, जळावू लागवड/ किटा इ. प्रकारच्या लाकडांची मागणी वाढली आहे. तसेच दरवर्षी साग, बांबू, सावर इ. झााडांची लागवड केली जाते. परंतू लोकांची इमारती झाडांची वाढती गरज भागविण्यासाठी सदरची योजना चालू ठेवणे अंत्यत निकडीचे आहे. | तृ.व. | 201 | | | | | अद्यापि अप्राप्त |
| | | | | व्दि.व. | 127 | | | | | |
| | | | | प्र.व. | 203 | | | | | |
| | | | | पू.पा. | 51 | | | | | |
| | | | | **एकूण** | **751** | | | | | |
| 4 | किरकोळ जंगल उत्पन्न (4406 0106) | रायगड | किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास करण्यासाठी या योजनातंर्गत रोशा गवत, घायपात, तेंदू, हिरडा, कोकम, रबर, काजू, चंदन, खैर, मोह इ. वनस्पतींची लागवड केली जाते या लागवडीवर स्थानिक लोकांची उपजिविका अवलंबून असते. दरवर्षी नियतव्ययाच्या उपलब्ध्तेच्या नविन क्षेत्रात लागवडीची कामे घेतली जातात. व | पं.व. | 42 | 15.00 | 19.52 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| | | | | तृ.व. | 81 | | | | | |
| | | | | प्र.व. | 102 | | | | | |
| | | | | **एकूण** | **225** | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आधीच्या लागवडीची देखभाल घेतली जाते. | | | | | | | |
| 5 | अकाष्ट वनोपजासह औषधी वनस्पतींची लागवड (4406 0492) बिगर आदिवासी उपयोजना) | रायगड | निसर्गाने उदार अंत:करणाने औषधी वनस्पतीचे विशाल भांडार आपल्याकडे सुपूर्द केले आहे. परंतू आपल्यापैकी अनेकांना याबददलचे फारच मर्यादीत ज्ञान आहे. अनादी काळापासून आपल्याकडे पारंपारिक औषधी वनस्पतींचा उपयोग केला जातो. त्यातील अनेक वनऔषधींच्या उपयोगाचे ज्ञान आपणास माहित नाही व ते मिळण्यासाठी वनक्षेत्रामध्ये अकाष्ठ वनोपजाची लागवड ह्या योजनेअंतर्गत औषधी वनस्पतींची लागवड करून त्याचा उपयोग सर्वसामान्य जनतेपर्यंत | प्र.व. | 12 | 0.90 | 1.01 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| | | | | **एकूण** | **12** | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पोहाचविणे ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेवून वनजमिनीवर औषधी वनस्पतींची लागवड योजना राबविण्यांत येत आहे. | | | | | | | |
| **बिगर आदिवासी उपयोजना - नविन बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |
| 1 | संयुक्त वनव्यवस्थापन | रायगड | समाजास बरोबर घेवून वनसंरक्षण करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय वननिती 1988 अन्वये वनक्षेत्राचा विकास करणेसाठी स्थनिक जनता व शासन मिळून वनसंरक्षण करणे व वनसंरक्षणामुळे तसेच रोपवनामुळे मिळणा-या उत्पादनाचे फायदे तसेच वनांचा व समाजाच्या सर्वांगीण विकास करणे. हे उदिदष्टय ठेवून ही योजना राबविण्यात येते. | पूरक कामे | | 66.00 | 66.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | अग्नीपासून वनांचे संरक्षण | रायगड | वनसंवर्धन व वनसंरक्षण करण्याच्या दृष्टीने या योजनेतंर्गत विविध कामे प्रस्तावित आहेत. सन 2008-09 मध्ये 2 निरिक्षण मनोरे उभारण्याचे प्रस्तावित आहेत. | पूरक कामे | 3.00 | 3.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 3 | वनसंरक्षणासाठी संरक्षण भिंतीची उभारणी (2406 2277) | ठाणे | ठाणे जिल्हयातील ठाणे वनविभागातील वनसंरक्षण व वनसंवर्धन तसेच अतिक्रमणाच्या दृष्टीकोनातून अतिसंवेदनशील वनक्षेत्राला प्रतिबंधक 3.922 कि.मी. लांबीची दगडी भिंत घालणे प्रस्तावित आहेत. | पूरक कामे | 200.00 | 200.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 4 | वनपर्यटन स्थळाचा विकास जिल्हा वार्षिक योजना | रायगड | रायगड जिल्हातील घारापूरी येथील वनवश्राम गृह, जिजामाता उद्यान-पाचाड सुशोभिकरण तसेच श्रीवर्धन समुद्र किना-यावर सुरू लागवड करणे इ. कामे प्रस्तावित आहेत. | पूरक कामे | 20.00 | 20.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | वनसंरक्षणार्थ शस्त्रागार बांधणे (2406 2152) | ठाणे | ठाणे वनवृत्तामध्ये शस्त्र व दारूगोळयाच्या सुरक्षिततेसाठी 1 शस्त्रागार इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. | पूरक कामे | | - | 5.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 6 | पर्यायी वनिकरण योजना (2406 1352) | ठाणे व रायगड | वनसंवर्धन अधिनियम 1980 अतंर्गत वनक्षेत्राचा वापर वनेत्तर कामासाठी करण्यास मंजूर केलेल्या क्षेत्राच्या बदल्यात तेवढेच वनेत्तर क्षेत्र प्रकल्प यंत्रणेकडूनमिळते सदरचे वनेत्तर क्षेत्रातील वनांचा -हास होवू नये तसेच जमिनीची धूप रोखण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. | द.व. | 305.41 | - | - | 406.39 | - | माहे मे 08 अखेर अनुदान प्राप्त |
| | | | | न.व. | 34.00 | | | | | |
| | | | | आ.व. | 139.62 | | | | | |
| | | | | सा.व. | 52.82 | | | | | |
| | | | | स.व. | 119.34 | | | | | |
| | | | | पा.व. | 166.23 | | | | | |
| | | | | च.व. | 114.78 | | | | | |
| | | | | तृ.व. | 265.46 | | | | | |
| | | | | व्दि.व. | 211.87 | | | | | |
| | | | | प्र.व. | 1119.04 | | | | | |
| | | | | पू.पा. | 123.15 | | | | | |
| | | | | **एकूण्** | **2651.72** | | | | | |
| **राज्यस्तरीय उपयोजना - चालू बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |
| 1 | सर्वसाधारण वापरासाठी | रायगड | वाढती लोकसंख्या व वाढत्या | प्र.वर्ष | 270 | 5.89 | 8.77 | - | - | अनुदान अद्यापि |
| | | | | **एकूण** | **270** | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागणा-या वृक्ष जातीच्या झाडांची लागवड (4406 0545) **राज्यस्तरीय** | | औद्योगिकरणासाठी इमारती सागवान, जळावू लागवड/ किटा इ. प्रकारच्या लाकडांची मागणी वाढली आहे. तसेच दरवर्षी साग, बांबू, सावर इ. झाडांची लागवड केली जाते. परंतू लोकांची इमारती झाडांची वाढती गरज भागविण्यासाठी सदरची योजना चालू ठेवणे अंत्यत निकडीचे आहे. | च.व. | - | | | | | अप्राप्त |
| 2 | मृदसंधारणार्थ विशिष्ठ जागेवर वनिकरण करणे (4406 0044) | ठाणे | जमिनीचा अयोग्य वापर वनांचे मोठया प्रमाणात नुकसान व यापुर्वी झालल्या अनियंत्रित वृक्ष तोडीमुळे वनांच्या संपत्तीत घट झाली व वारंवार उदभवणा-या महापुरामुळे कृषि उत्पादनावर त्याचा परिणाम झाला. पाण्याची पातळीसुध्दा ब-याचशा प्रमाणांत खाली गेली. येवू घातलेले संकट थांबविण्यासाठी मृदसंधारणार्थ वनिकरण ही | व्दि.व.<br>**एकूण** | 80<br>**80** | - | 5.36 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | योजना आखण्यांत आली व ती राबविण्यांत येते. | | | | | | | |
| 3 | औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागणा-या वृक्ष जातीच्या झाडांची लागवड (4406 0091) बिगर आदिवासी योजना | रायगड | वाढती लोकसंख्या व वाढत्या औद्योगिकरणासाठी इमारती सागवान, जळावू लागवड/ किटा इ. प्रकारच्या लाकडांची मागणी वाढली आहे. तसेच दरवर्षी साग, बांबू, सावर इ. झाडांची लागवड केली जाते. परंतू लोकांची इमारती झाडांची वाढती गरज भागविण्यासाठी सदरची योजना चालू ठेवणे अंत्यत निकडीचे आहे. | प्र.व.<br>पू.पा.<br>**एकूण** | 16<br>8<br>**24** | 1.00 | 1.00 | - | - | 0 |
| 4 | संयुक्त वनव्यवस्थापन (2406 1521) | ठाणे व रायगड | समाजास बरोबर घेवून वनसंरक्षण करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय वननिती 1988 अन्वये वनक्षेत्राचा विकास करणेसाठी स्थनिक जनता व शासन मिळून वनसंरक्षण करणे | व्दि.व. | 690 | - | - | 26.44 | - | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व वनसंरक्षणामुळे तसेच रोपवनामुळे मिळणा-या उत्पादनाचे फायदे तसेच वनांचा व समाजाच्या सर्वांगीण विकास करणे. हे उदिदष्टय ठेवून ही योजना राबविण्यात येते. | | | | | | | |
| **राज्यस्तरीय उपयोजना - नविन बाब प्रस्ताव** | | | | | | | | | | |
| 1 | निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास | ठाणे व रायगड | ठाणे व रायगड जिल्हयातील प्रसिध्द वनपर्यटन स्थळांचा विकासाची कामे प्रस्तावित आहेत. | पूरक कामे | | 57.00 | 57.00 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |
| 2 | तपासणी नाक्याचे बळकटीकरण करणे **(2406 2141)** | ठाणे | वनसंरक्षणाच्या दृष्टीकोनातून तपासणी नाक्याची उभारणी करण्याचे काम प्रस्तावित आहे. | पूरक कामे | | - | 6.08 | 6.08 | - | अनुदान माहे जुलै मध्ये प्राप्त झाले आहे. |
| **केंद्रपुरस्क्त योजना** | | | | | | | | | | |
| 1 | 12 वे वित्त आयोग (2406 2072) **100 टक्के केंदपुरस्क्त योजना** | ठाणे व रायगड | 1.औनत्व अपगत वनक्षेत्रामध्ये जल व मृद संधारणाची कामे करणे 2. नविन इमारतीचे बांधकाम करणे 3. जुने इमारतींचे बांध्काम करणे 4. संयुक्त वनव्यवस्थापन अंतर्गत बांधकाम करणे 5. | पूरक कामे | | - | 975.36 | - | - | अनुदान अद्यापि अप्राप्त |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वनसंरक्षणाची कामे करणे 6. जनजागृती प्रसिध्दी व विस्तार | | | | | | |
| 2 | पश्चिम घाट विकास कार्यक्रम (2551 0045 | ठाणे व रायगड | सदर योजनेतंर्गत पाणलोटाचा विकासाचे उदिदष्टय लक्षात घेणे रोपवनाची लागवड तसेच जलमृद संधारणाची कामे प्रस्तावित आहेत. | पूरक कामे | | 1054.16 | 27.15 | 5.99 | फक्त वेतनाकरिता 27.25 अनुदान प्राप्त |

## १२. सबसिडीचे कार्यक्रम, पध्दत रकमा, लाभार्थीबाबतची माहिती

वैयक्तीक लाभार्थी योजना राबविण्यांत येत नसल्याने सदरची माहिती निरंक आहे.

# १३. ज्या व्यक्तींना सवलती, पध्दत रकमा, लाभार्थीबाबतची माहिती

वन विभागामध्ये अशा प्रकारच्या सवलती, रकमा वगैरे दिल्या जात नाहीत.

# १४.इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती

ठाणे वनवृत्तांतर्गत असलेल्या कार्यालयामध्ये खालील माहिती ही इलंक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध आहे.

१) वनवृत्तांत काम करणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांच्या ज्येष्ठतायाद्या.

२) संपूर्ण वनवृत्ताचा लेखा सारांश.

३) वनवृत्तांत नियुक्त केलेले माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे यांची यादी.

४) वनवृत्तांकडून वरीष्ठ कार्यालयाकडे जाणारे सर्व प्रकारचे अद्ययावत मासिक तथा त्रैमासिक अहवाल.

५) मुख्य वनसंरक्षक ठाणे, यांचे कार्यालयात काम करणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांचा सेवापुस्तकातील तपशील.

६) विधानसभा व विधानपरिषद प्रश्नांशी संबंधित पुरविण्यांत आलेली माहिती.

# १५. लायब्ररीसह नागरिकांना माहिती मिळणसाठी दिलेल्या सुविधा

कोणत्याही नागरिकांस त्यांनी समक्ष अथवा लेखी माहिती मागणी केल्यास मागणी केलेली माहिती संबंधिताना उपलब्ध करून देणेंत येते

# १६.ठाणे वनवृत्तातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नाव व पदनामे

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता दुरध्वनी/फॅक्स क्रमांक | माहिती अधिकारी यांचे नांव व हुद्दा | अपिलीय अधिकारी यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|
| १. | मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचे कार्यालय, वनभवन बाराबंगला एरिया, कोपरी ठाणे पूर्व-४०० ६०३ दूरध्वनी क्र २५३२९८६५, २५३२९६४२ | श्री एस.एम.गुजर विभागीय वन अधिकारी (नियोजन) ठाणे | श्री भगवान मुख्य वनसंरक्षक ठाणे |
| २ | वनसंरक्षक, ठाणे यांचे कार्यालय एल बी एस मार्ग तिन हात नाका नौपाडा ठाणे पश्चिम ठाणे ४०० ६०२ फोन नं. २५४३४३४९ | श्री. एस. डी. नारनवार, सहा. वनसंरक्षक, र.रा.प. ठाणे | श्री. अे. आर. साळुंके, वनसंरक्षक ठाणे |
| ३. | उप वनसंरक्षक, डहाणू यांचे कार्यालय, पारनाका पंचायत समितीच्या बाजूला मु. पो. डहाणू ता. डहाणू जि. ठाणे पिन कोड नं. ४०१ ६०१ फोन नं. ९५२५२८ २२२३३७ | श्री. यु. व्ही. दिघे, सहा. वनसंरक्षक भवयो वाडा स्थित डहाणू | श्री. एस. एस. मिश्रा, उप वनसंरक्षक,डहाणू |
| ४. | उप वनसंरक्षक, जव्हार यांचे कार्यालय प्रांत ऑफिस जवळ मु. पो. जव्हार जि. ठाणे पिन कोड नं. ४०१ ६०३ फोन नं. ९५२५२० २२२२५२ | श्री. अे. अन. वाघाये, सहा. वनसंरक्षक | श्री. बी. पी. वाळिंबे, उप वनसंरक्षक, जव्हार |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | उप वनसंरक्षक, शहापूर यांचे कार्यालय, जुना आग्रा रोड, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापूर जवळ मु. पो. शहापूर ता. शहापूर, जि. ठाणे पिन कोड नं. ४२१ ६२१ फोन नं. ९५२५२७ २७२०९६ | श्री. अ. सं. लोखंडे, सहा. वनसंरक्षक, वनी शहापूर | श्री. अनवर अहमद, उप वनसंरक्षक, शहापूर |
| ६. | उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय अलिबागच्या मागे मु. पो. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड पिन कोड नं. ४०२ २०१ ९५२१४१ २२२०१६ | श्री. जी. यु. नाईक, सहा. वनसंरक्षक, अलिबाग | श्री. एस. यु. हिवलेकर, उप वनसंरक्षक अलिबाग |
| ७. | उप वनसंरक्षक, रोहा यांचे कार्यालय, सेवादल आळी मु. पो. रोहा, ता. रोहा, जिल्हा रायगड पिन कोड नं. ४०२ १०९<br>फोन नं. ९५२१९४ २४३७९१ | श्री. अे. डी. पाटील, सहा. वनसंरक्षक, जंकास रोहा | श्री. डी. डी. गुजेला, उप वनसंरक्षक, रोहा |

# <u>१७ इतर माहिती</u>
## वनगुन्हे व तक्रारी संदर्भात

महसुल वसुली / हानी संबंधी महत्वाच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा

अपिल प्रकरणे / वनगुन्हे प्रकरणे याबाबतची माहिती.

आर्थिक वर्ष २००७-२००८

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव/ वनविभाग | दिनांक ३१/३/२००७ रोजी प्रलंबित प्रकरणांची संख्या | वर्षामध्ये पडलेली भर ( दि.१/४/२००७ ते ३१/३/२००८) | वर्षामधील निपटारा ( दि.१/४/२००७ ते ३१/३/२००८) | वर्षाचे शेवटी प्रलंबित प्रकरणांची संख्या ( दि.३१/३/२००८ अखेर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे | ६५०६ | ७२२ | २३०२ | ४९२६ | |
| २ | डहाणू | ४६३३ | १८५० | २३३१ | ४१५२ | |
| ३ | जव्हार | २४३४ | ६२८ | १३९३ | १६६९ | |
| ४ | शहापूर | १४३७ | ५३५ | ६९८ | १२७४ | |
| ५ | अलिबाग | ६७९१ | १२७४ | १३१५ | ६७५० | |
| ६ | रोहा | २२६२ | ६२९ | १५८३ | १३०८ | |
| | **एकूण एकंदर** | **२४०६३** | **५६३८** | **९६२२** | **२००७९** | |

ठाणे वनवृत्तात गेल्या पाच वर्षात झालेले तेंदू पाने उत्पादन व प्राप्त महसूलाबाबतची माहिती.

वनवृत्त :- ठाणे .

| अ.क्र. | वर्ष | एकूण तेंदू घटकांची संख्या | एकूण प्रमाण गोणी संख्या | विक्री झालेल्या तेंदू घटकांची संख्या | तेंदू घटक विक्रीव्दारे प्राप्त वनमहसूल (रुपयामध्ये ) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 2003 | 4 | 2200 | 4 | 231000 |
| 2 | 2004 | 4 | 2200 | 3 | 92000 |
| 3 | 2005 | 4 | 2200 | 0 | 0 |
| 4 | 2006 | 4 | 2200 | 1 | 5000 |
| 5 | 2007 | 4 | 2200 | 4 | 363214 |

## तक्रारी-

| वर्ष | वन विभाग | संख्या | तक्रारीचे स्वरुप | कोणाकडे प्रलंबित आहे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०६-०७ | ठाणे | २४ | अवैध वृक्षतोड तसेच अतिक्रमणा बाबत | उप वनसंरक्षक ठाणे | २१ प्रकरणे वन विभागाकडे प्रलंबित असून ३ प्रकरणाचा अहवाल वरीष्ठांना सादर केला आहे. |
| ०६-०७ | डहाणू | ३ | --,,-- | उप वनसंरक्षक, डहाणू | २ प्रकरणे वनविभागाकडे प्रलंबित असून १ प्रकरणाचा अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे. |
| ०६-०७ | जव्हार | ६ | --,,-- | उप वनसंरक्षक, जव्हार | ४ प्रकरणे वन विभागाकडे प्रलंबित असून २ प्रकरणाचा अहवाल वरीष्ठांना सादर केला आहे. |
| ०६-०७ | शहापूर | १३ | --,,-- | उप वनसंरक्षक,शहापूर | १० प्रकरणे वन विभागाकडे प्रलंबित असून १ प्रकरणाचा अहवाल वरीष्ठांना सादर केला आहे.<br>२ तक्रार अर्ज नस्तीबध्द |
| ०६-०७ | अलिबाग | २२ | --,,-- | उप वनसंरक्षक, अलिबाग | २१ प्रकरणे वन विभागाकडे प्रलंबित असून १ प्रकरणाचा अहवाल वरीष्ठांना सादर केला आहे. |
| ०६-०७ | रोहा | ८ | --,,-- | उप वनसंरक्षक, रोहा | ५ प्रकरणे वन विभागाकडे प्रलंबित असून ३ प्रकरणाचा अहवाल वरीष्ठांना सादर केला आहे. |
| | **एकूण** | **७६** | | | **६३ प्रकरणे वनविभागाकडे प्रलंबित असून ११ प्रकरणांचा अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे. २ तक्रार अर्ज नस्तीबध्द** |